कोकणसाद
www.kokansad.com
गुरुवार, दि. ११ ऑगस्ट २०२२

# हळबे महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम

## कसई दोडामार्ग नगरपंचायतीचे आयोजन

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग** : राष्ट्रीय पातळीवरील स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रमाची सुरुवात ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान संपन्न होत असून मंगळवारी ९ ऑगस्ट ११.०० वाजता राष्ट्रीय पातळीवर एकाचवेळी होणाऱ्या सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. हा दोडामार्ग तालुक्याचा शासकीय कार्यक्रम येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. हा कार्यक्रम कसई दोडामार्ग नगरपंचायतने आयोजित केला होता.

यावेळी दोडामार्ग तहसीलदार अरुण खानोलकर, उपनिरीक्षक जयेश ठाकुर, कसई दोडामार्ग नगरपंचायतचे मुख्याधिकारी शिवराज गायकवाड, सहाय्यक गटविकास अधिकारी निलेश जाधव, तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर, पंचायत समिती कर्मचारी, आरोग्य विभाग कर्मचारी, फॉरेस्ट कार्यालय अधिकारी, नगरसेवक, नगर पंचायत कर्मचारी, स्वातंत्र्य सेनानी सूर्यकांत परमेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, कॅप्टन कृष्णा गवस, ग्रामस्थ, विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. सावंत व नगरपंचायतचे मुख्याधिकारी गायकवाड यांनी केले. सकाळी ११.०० वाजता राष्ट्रगीत गायन झाले. यावेळी एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी उपस्थिताना प्रमुख मानवंदना दिली.

संपूर्ण देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व 'हर घर तिरंगा' या उपक्रमांतर्गत विविध शासकीय, निमशासकीय शाळा, महाविद्यालय पातळीवर शासनाने ठरवून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. राष्ट्रीय पातळीवरील स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रम जिल्ह्यात ठिकठिकाणी उत्साहात होत आहे. दोडामार्ग तालुक्याचा शासकीय कार्यक्रम येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या प्रांगणात शिक्षकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात झाला. यावेळी दोडमार्ग नगरपंचायतीचे अधिकारी उपस्थित होते.

### क्रांतिदिनाचे औचित्य साधून सूर्यकांत परमेकर यांचा सत्कार

संपूर्ण देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व 'हर घर तिरंगा' या उपक्रमांतर्गत विविध शासकीय, निमशासकीय शाळा, महाविद्यालय पातळीवर शासनाने ठरवून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. याची सुरुवात येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातून तालुका प्रशासनाने केली. यावेळी क्रांती दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्यावतीने गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले, दोडामार्ग येथील भाई उर्फ सूर्यकांत परमेकर यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या हस्ते कॅप्टन कृष्णा गवस व प्रमुख अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी भाईंना उदंड आयुष्य लाभावे अशा सदिच्छा पर शुभेच्छा दिल्या.



दोडामार्गात महाविद्यालयात स्वातंत्र्य सेनानी सूर्यकांत परमेकर यांना सन्मानित करताना प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सोबत कॅप्टन गवस, तहसीलदार अरुण खानोलकर, सीईओ गायकवाड, निलेश जाधव व बनकर.



हर घर तिरंगा सामूहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम प्रसंगी दोडामार्ग महाविद्यालयात तहसीलदार अरुण खानोलकर, सीईओ शिवराज गायकवाड, सहाय्यक बीडीओ निलेश जाधव, भाजपा पदाधिकारी एकनाथ नाडकर्णी, सुधीर दळवी, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सूर्यकांत परमेकर, प्रमोद बनकर व अधिकारी.